CNR-MHBU11-000176-2024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १३/०३/२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | १३/०३/२०२४ |
| निकाल दिनांक | : | २४/०३/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिना दिवस<br>०२ ०० ११ |

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांच्या न्यायालयात**

**(सदस्य :– पुरुषोत्तम भा. जाधव.)**

**<u>मोटार अपघात दावा क्र. १५/२०२४</u>** **<u>निशाणी क्र. ३८</u>**

१) **सौ. बेबाबाई रामसिंग जाधव,**
वय – ४६ वर्ष, व्यवसाय – घरकाम,

२) **रामसिंग नरसिंग जाधव,**
वय – ५१ वर्ष, व्यवसाय – काही नाही,

३) **क्रिष्णा रामसिंग जाधव,**
वय – १९ वर्ष, व्यवसाय – शिक्षण,

४) **तेजस रामसिंग जाधव,**
वय – २४ वर्ष, व्यवसाय – काही नाही,

५) **सौ. कौशल्याबाई नरसिंग जाधव,**
वय – ६७ वर्ष, व्यवसाय – काही नाही,

६) **नरसिंग इरभान जाधव,**
वय – ७६ वर्ष, व्यवसाय – काही नाही,

सर्व राहणार लक्ष्मी नगर, मलकापूर,
तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा.

**... अर्जदार/ दावेदार.**

–विरुध्द–

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

१) **पवन प्रकाश गिरी,**
वय – सज्ञान, व्यवसाय – व्यापार,
राहणार दुर्गा नगर, मलकापूर, तालुका मलकापूर,
जिल्हा बुलढाणा.

२) **शाखाधिकारी, न्यू इंडिया इन्शोरन्स कंपनी लि.,**
पत्ता – भारत कला रोड, राठी बिल्डींग,
मलकापूर, तालुका मलकापूर, जिल्हा बुलढाणा.

**... सामनेवाला.**

---

| | | |
|---|---|---|
| **अर्जदारांतर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. के.व्ही. परमार.** |
| **सामनेवाला क्र. १ तर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. आर.एम. निकम.** |
| **सामनेवाला क्र. २ तर्फे विधीज्ञ** | :- | **श्री. डी.एस. चव्हाण.** |

---

## न्यायनिर्णय

**(पारीत दिनांक – २४ मार्च, २०२६)**

मयत विक्रम रामसिंग जाधव यांचे आई-वडील, भाऊ, आजी आणि आजोबा यांनी मोटार वाहन अधिनियम कलम १६६ अन्वये मोटार अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

**अर्जदारांचे प्रकरण थोडक्यात येणेप्रमाणे –**

**२)** तारीख ०३/०२/२०२४ रोजी मयत विक्रम हा जांभूळधाबा येथे पेंटींगच्या कामानिमित्त गेलेला होता. तेथे रंग कमी पडल्यामुळे त्याचे मालक

अशोक भास्कर पाटील यांनी मयत विक्रम यास रंग आणण्यासाठी मलकापूर येथे त्यांची मोटरसायकल क्र. एमएच २८ – वाय १२५९ या वाहनाने पाठविले. तो सदर वाहनाने मलकापूरकडे येत असताना सकाळी साडेनऊ वाजता लोणवाडी फाटा, बोदवड रोड येथे श्री. बेलोकार यांचे शेताजवळ पोहोचला असता मलकापूरकडून जांभूळधाबा गावाकडे जाणारा ट्रक क्र. एमएच ४० – एके ४४४७ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे व रस्त्याचे परिस्थितीचा विचार न करता चालवून मयत विक्रम यास जोरदार धडक मारून जखमी केले. त्यामुळे मयत विक्रम यास तात्काळ उपजिल्हा सामान्य रुग्णालय, मलकापूर येथे उपचारासाठी आणले असता, डॉक्टरांनी मयत विक्रम यास मृत घोषित केले. सदर अपघाताबाबत तेजस रामसिंग जाधव यांनी पोलीस स्टेशन, मलकापूर येथे फिर्याद दिल्यावरून भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४–अ, ४२७ अन्वये मलकापूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा क्र. ४६/२०२४ नोंदवण्यात आला. सदरचा ट्रक सामनेवाला क्र. १ यांच्या मालकीचा होता आणि तो सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत होता. त्यामुळे मोटर अपघात नुकसान भरपाई देण्यास सामनेवाला क्र. १ व २ हे जबाबदार आहेत.

३) अर्जदारांचे प्रकरण पुढे असेही की, मयत विक्रम इयत्ता बारावीपर्यंत शिकला होता आणि तो उत्कृष्ट पेंटर सुद्धा होता. मयत विक्रम हा अशोक भास्कर पाटील यांचे पायल कलर आर्टमध्ये पेंटींगचे काम करीत होता. त्याला दिवसाकाठी किमान रुपये ५००/– उत्पन्न मिळत होते. तो बाहेरगावी गेल्यास त्यास दररोज रुपये ७००/– ते ८००/– मिळत होते. त्याच्यावर त्याचे आई–वडील, भाऊ,

आजी आणि आजोबा म्हणजेच अर्जदार अवलंबित होते. मयत विक्रम यांचे वडील पॅरालिसीसने आजारी असल्याने त्यांना उठता बसता येत नव्हते. मयत विक्रमचे अपघातावेळी वय २२ वर्षाचे होते. अर्जदारांनी मोटार अपघात नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये २५,००,०००/– ची मागणी केलेली आहे.

४) सामनेवाला क्र. १ यांनी निशाणी क्र. ९ वर आपला लेखी जबाब दाखल करून अर्जास विरोध केला आहे. त्यांनी अर्जातील प्रत्येक कथन नाकारली आहेत. त्यांच्या अधिकच्या जबाबात त्यांचे असे म्हणणे आहे की, सामनेवाला क्र. १ हा सदर ट्रकचा मालक असून सदरचे ट्रक सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत आहे. अपघातावेळी सदर विमा पॉलिसी वैध होती, त्यामुळे अपघात इत्यादी सिद्ध झाल्यास नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र. २ यांच्यावर येते. सामनेवाला क्र. १ यांचे असे म्हणणे आहे की सदरचा अपघात ट्रकचालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेला नाही, ट्रकचालक हा ट्रक काळजीपूर्वक व रस्त्याच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन चालवत होता. या सर्व कारणास्तव अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती सामनेवाला क्र. १ यांनी केली आहे.

५) सामनेवाला क्र. २ यांनी सुद्धा निशाणी क्र. १३ वर आपला लेखी जबाब दाखल करून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यांनी अपघाताचे स्वरूप, ट्रक चालकाचा निष्काळजीपणा, मयत विक्रम यांचे वय, उत्पन्न, अर्जदारांचे त्यांच्यावरील अवलंबित्व इत्यादी सर्व बाबी नाकारलेल्या आहेत. मयत विक्रम त्याच्या मोटरसायकलवर घाईगर्दीने जात असल्याचे दिसते व त्यामुळे सदर

अपघातास मयत विक्रम सुद्धा जबाबदार होता, असे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. सामनेवाला क्र. १ यांनी ट्रकचालकाकडे वैध वाहन चालवण्याचा परवाना असल्याचे सिद्ध केल्याशिवाय सामनेवाला क्र. २ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार ठरणार नाहीत असेही सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. ट्रक चालकाकडे कोणताही वाहन चालवण्याचा वैध परवाना नव्हता, त्यामुळे विमा पॉलिसीच्या अटी शर्तींचा भंग झालेला आहे व त्यामुळे सामनेवाला क्र. २ कोणतीही नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाही असे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे.

६) उपरोक्त परिस्थितीत निशाणी क्र. १४ वर खालील प्रमाणे मुद्दे काढण्यात आले असून त्याखाली नमूद कारणांसाठी त्यावर निष्कर्ष नोंदविण्यात येतात ते येणेप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | ट्रक क्र. एमएच ४० एके ४४४७ हे वाहन गुंतलेल्या अपघातात मयत विक्रम रामसिंग जाधव यांचा मृत्यू झाला, हे अर्जदारांनी सिद्ध केले का? | सकारात्मक. |
| २. | सदरचा अपघात सदर वाहनाच्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजेपणाने वाहन चालवल्यामुळे घडला, असे अर्जदाराने सिद्ध केले का? | सकारात्मक. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३. | अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत का? असल्यास किती? | होय, रक्कम रुपये २०,९७,६००/-. |
| ४. | नुकसान भरपाई देण्यास कोण जबाबदार आहे? | सामनेवाला क्र. २. |
| ५. | आदेश आणि अवार्ड काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

७) अर्जाच्या पृष्ठ्यर्थ अर्जदारांनी अर्जदार क्र. १ बेबाबाई यांची अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ म्हणून निशाणी क्र. १६ वर आणि अर्जदारांच्या साक्षीदार क्र. २ अशोक भास्कर पाटील यांची निशाणी क्र. ३३ वर साक्ष घेतली आहे. त्याचप्रमाणे निशाणी क्र. १९ ते ३१ आणि ३४ वर कागदपत्र दाखल केली आहे. याशिवाय अधिकचा पुरावा देणे नसल्याचे पुरुसीस अर्जदारांनी निशाणी क्र. ३५ वर दाखल केली आहे.

८) सामनेवालांनी कोणताही पुरावा दिला नाही. त्यांना पुरावा देणे नसल्याबाबत सामनेवाला क्र. १ व २ यांनी अनुक्रमे निशाणी क्र. ३६ आणि ३७ वर पुरसीस दिली आहे.

९) अर्जदारांचे विद्वान वकील श्री. के.व्ही. परमार, सामनेवाला क्र. १

यांचे विद्वान वकील श्री. आर.एम. निकम आणि सामनेवाला क्र. २ यांचे विद्वान वकील श्री. डी.एस. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ व २ करिता :-</u>**

१०) अर्जदारांच्या कथनाप्रमाणे तारीख ०३/०२/२०२४ रोजी मयत विक्रम हा जांभूळधाबा येथे पेंटींगच्या कामानिमित्त गेलेला होता. तेथे रंग कमी पडल्यामुळे त्याचे मालक अशोक भास्कर पाटील यांनी मयत विक्रम यास रंग आणण्यासाठी मलकापूर येथे त्यांची मोटरसायकल क्र. एमएच २८ – वाय १२५९ या वाहनाने पाठविले. तो सदर वाहनाने मलकापूरकडे येत असताना सकाळी ९:३० वाजता लोणवाडी फाटा, बोदवड रोडवर श्री. बेलोकार यांचे शेताजवळ पोहोचला असता मलकापूरकडून जांभूळधाबा गावाकडे जाणारा ट्रक क्र. एमएच ४० – एके ४४४७ चे चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे व रस्त्याचे परिस्थितीचा विचार न करता मयत विक्रम यास जोरदार धडक मारून जखमी केले. त्यामुळे मयत विक्रम यास तात्काळ उपजिल्हा सामान्य रुग्णालय, मलकापूर येथे उपचारासाठी आणले असता डॉक्टरांनी मयत विक्रम यास मृत घोषित केले. सदर अपघाताबाबत तेजस रामसिंग जाधव यांनी पोलीस स्टेशन मलकापूर येथे फिर्याद दिल्यावरून भारतीय दंड संहिता कलम २७९, ३०४-अ, ४२७ अन्वये मलकापूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा क्र. ४६/२०२४ नोंदवण्यात आला. याप्रमाणे अर्जदारांचे प्रकरण

आहे आणि त्याप्रमाणेच अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ बेबाबाई जाधव (निशाणी क्र.१६) यांनी आपल्या साक्षीत बाबी नमूद केल्या आहेत.

**११)** अर्जदाराचे साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासणीत मोटरसायकल आणि ट्रक यांची समोरासमोर धडक झाल्याचे मान्य केले आहे. या बाबीचा संदर्भ देत सामनेवाला क्र. २ यांचे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, जर दोन वाहनांची समोरासमोर धडक झाली असेल, तर सदर अपघातास दोन्हीही वाहनांचे चालक जबाबदार ठरतात. सदरच्या युक्तिवादास कोणताही आधार असल्याचे दिसून येत नाही. केवळ दोन वाहनांची समोरासमोर धडक झाली, म्हणून दोन्ही वाहनांचे चालक अपघातास जबाबदार ठरतात, असे म्हणता येणार नाही. तसा निष्कर्ष काढण्यास कोणताही आधार दिसून येत नाही.

**१२)** मयत विक्रम याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नव्हता व त्यामुळे मयत विक्रम हे सुद्धा अपघातास जबाबदार होते, असे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. मयत विक्रम यांच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नव्हता ही बाब अर्जदाराचे साक्षीदार क्र. १ बेबीबाई जाधव यांनी नाकारली आहे. हे खरे की, मयत विक्रम यांचा वाहन चालवण्याचा परवाना अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे मयत विक्रम याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नव्हताच असे म्हणता येणार नाही. दुसरे असे की, केवळ वाहन चालवण्याचा परवाना नव्हता, म्हणून मयत विक्रम हे सुद्धा अपघातास कारणीभूत होते, असे म्हणता येणार नाही.

१३) दुसरे असे की, सदर अपघात झालेलाच नाही, ट्रक सदर अपघातात गुंतलेले नाही व ट्रक चालकाविरुद्ध मलकापूर शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला नाही, असे कोणत्याही सामनेवाल्याचे म्हणणे नाही. अर्जदार क्र. १ यांच्या तोंडी पुराव्यास फॉर्म एए (निशाणी क्र. १९), प्रथम खबर (निशाणी क्र. २०), घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. २१), मरणोत्तर पंचनामा (निशाणी क्र. २२), शवविच्छेदन अहवाल (निशाणी क्र. २३) आणि दोषारोपपत्र (निशाणी क्र. ३१) हे कागदपत्र पुष्टी करतात. सामनेवाल्यांनी ट्रक चालकाची साक्ष घेतलेली नाही, त्याचप्रमाणे ती का घेतली नाही, याचेही स्पष्टीकरण दिलेले नाही.

१४) उपरोक्त तोंडी पुरावा, कागदपत्री पुरावा आणि अपघात झाल्याचे, त्यात सदरचा ट्रक गुंतलेला असल्याचे सामनेवाला यांनी नाकारलेले नसल्याची बाब लक्षात घेता, अर्जदारांनी दिलेला पुरावा या प्रकरणाचे स्वरूप लक्षात घेता विश्वसनीय दिसून येतो. सदर पुराव्याच्या आधारे सदर ट्रक चालकाने भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे ट्रक चालवून मयत विक्रम यांचे मोटरसायकलला धडक दिली, त्यामुळे मयत विक्रम जखमी झाला आणि मृत्यू पावला हे सिद्ध होते. त्यामुळे मुद्दा क्र. १ आणि २ यांच्यावर सकारात्मक निष्कर्ष नोंदवण्यात येतात.

**मुद्दा क्र. ३ ते ५ करीता :–**

१५) मृतक विक्रम यांचा ट्रक अपघातात मृत्यू झाल्याचे सिद्ध झाले आहे.

त्यामुळे या प्रकरणी नुकसान भरपाई किती मिळू शकते, हे ठरवणे आवश्यक आहे. प्रथमतः मृतक विक्रम यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या उत्पन्नातील नुकसानी ठरवण्यासाठी त्यांचे उत्पन्न, वय, त्यांची वैवाहिक स्थिती, त्यांच्या उत्पन्नातील भविष्यातील वाढ, त्यांच्यावर अवलंबतांची संख्या इत्यादी बाबी पाहणे आवश्यक आहे.

**१६)** प्रथमतः मृतक विक्रम यांच्या उत्पन्नाबाबत पुरावा पाहणे योग्य ठरेल. अर्जदारांचे साक्षीदार क्र. १ बेबाबाई जाधव (निशाणी क्र. १६) आणि अर्जदारांचे साक्षीदार क्र. २ श्री. अशोक पाटील (निशाणी क्र. ३३) यांनी आपआपल्या पुराव्यात असे नमूद केले आहे की, मयत विक्रम हा साक्षीदार क्र. २ श्री. अशोक पाटील यांच्याकडे पेंटींगचे काम करीत होता आणि त्याला दररोज रुपये पाचशे मिळत होते आणि तो जेव्हा पेंटींगच्या कामासाठी बाहेरगावी जात होता त्यावेळी त्याला रुपये ७००/- ते ८००/- मिळत होते.

**१७)** अर्जदाराचे साक्षीदार क्र. २ अशोक पाटील यांच्या दुकानात वीसपेक्षा अधिक व्यक्ती कामावर होत्या, मात्र त्यांनी वेतन नोंदवही ठेवलेली नाही, असे त्यांनी आपल्या उलटतपासणी कबूल केले आहे. या बाबीचा संदर्भ देऊन सामनेवाला क्र. २ यांचे विद्वान वकील यांनी असा युक्तिवाद केला की, मयत विक्रम यांच्या कामाबाबत कोणताही कागदपत्रे पुरावा दाखल केलेला नसल्याने व अर्जदाराचे साक्षीदार क्र. २ यांनी वेतन नोंदवही ठेवत नसल्याचे कबूल केल्याने मयत विक्रम याचे उत्पन्न अर्जदार सिद्ध करू शकलेले नाहीत.

१८) मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई प्रकरणात मयताचे उत्पन्न सिद्ध करण्यासाठी कागदपत्रे दाखल केली पाहिजे अशी आवश्यकता नाही. अभिलेखावर असलेल्या पुराव्याच्या आधारे काय बाबी सिद्ध होतात, हे पाहणे आवश्यक आहे. अपघातावेळी मयत विक्रम त्याच्या मालकाची मोटरसायकल घेऊन रंग आणण्यास जात होता, असे अर्जदारांचे प्रकरण आहे. सदरची बाब सामनेवाल्यांनी फारशी आव्हानित केलेली नाही. सदर बाब आणि अर्जदार क्र. १ आणि २ यांचा तोंडी पुरावा लक्षात घेता मयत विक्रम हे अर्जदाराचे साक्षीदार क्र. २ यांच्याकडे काम करीत होते, ही बाब सिद्ध होते. सदरचे काम पेंटींगचे होते हेही सिद्ध झाले आहे. सदरचे काम कुशल काम असते आणि ही बाब लक्षात घेता मयत विक्रम यास दररोज रुपये ५००/– उत्पन्न मिळत होते, हा अर्जदारांचा पुरावा अधिक संभावनीय वाटतो. त्या पुराव्याच्या आधारे मयत विक्रम हा दररोज पाचशे रुपये उत्पन्न मिळवत होता, हे सिद्ध होते. आठवडी सुट्टी वगळून मयत विक्रम यास दरमहा रुपये १३,०००/– म्हणजेच वार्षिक रक्कम रुपये १,५६,०००/– उत्पन्न होते, हे सिद्ध होते.

१९) मृत विक्रम यांचे वय २२ वर्ष असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. अपघातातील गुन्ह्यांच्या कागदपत्रात मयत विक्रम चे वय २० किंवा २१ नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे मृत विक्रम यांचे वय २२ वर्ष असल्याबाबत सामनेवाले यांनी गंभीर वाद उपस्थित केलेला नाही. या परिस्थितीत मृत विक्रम यांचे वय २२ वर्ष असल्याचे सिद्ध होते. सदर वय आणि त्यांचे कामाचे स्वरूप पहाता आणि

प्रस्थापित न्यायतत्वांच्या अनुषंगाने त्यांच्या उत्पन्नात भविष्यात ४०% टक्क्यांनी वाढ झाली असती. हे सर्व लक्षात घेता त्यांचे वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये २,१८,४००/— येते.

**२०)** अर्जदार हे मृत विक्रमचे आई, वडील, भाऊ आणि आजी–आजोबा आहेत, याबाबत वाद नाही. ते मृत विक्रम यांच्यावर अवलंबून होते, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदार क्र. २ रामसिंग हे मयत विक्रम यांचे वडील आहेत, त्यांना पॅरालिसीस झाल्यामुळे ते कोणताही कामधंदा करत नाही, असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांच्या साक्षीदार क्र. २ यांच्या उलट तपासणीत सदरची बाब आव्हानित केली असली तरी अर्जदार क्र. २ हे काही काम करतात, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. त्याचप्रमाणे इतर अर्जदार काही काम करतात असाही पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदारांची एकूण संख्या सहा आहे आणि मयत विक्रम यांचे प्रतिदिन उत्पन्न केवळ रुपये ५००/– होते, याचा विचार करता अर्जदारांपैकी अर्जदार क्र. ४ तेजस हा मयत विक्रमचा मोठा भाऊ असल्याने तो काहीतरी काम करीत असावा, हा सामन्यावाल्यांचा युक्तिवाद योग्य वाटतो. या परिस्थितीत मयत विक्रम आणि अर्जदार क्र. ४ तेजस यांच्या संयुक्त उत्पन्नातून अर्जदारांचे कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असावा, असे म्हणण्यास पुरेसा वाव आहे. त्यामुळे मयत विक्रम यांचेवर अवलंबून असणाऱ्यांचे संख्या तीन ठरविल्यास ते योग्य व न्याय्य होईल. त्यामुळे मृत विक्रम यांच्यावर एकूण ३ व्यक्ती अवलंबून होत्या, हे सिद्ध होते. मयत विक्रम हा अविवाहित होता याबाबत

कोणताही वाद नाही. तो अविवाहित होता आणि त्याच्यावर तीन व्यक्ती अवलंबित होत्या या बाबी लक्षात घेता नुकसान भरपाई ठरवितांना त्यांच्या उत्पन्नातून ५०% रक्कम वजा करणे आवश्यक आहे. सदरचे रक्कम वजावट केल्यानंतर नुकसान भरपाई ठरवण्यासाठी त्यांचे वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये १,०९,२००/– येते.

**२१)** वर नमूद केल्याप्रमाणे मृतक विक्रम यांचे वय २२ वर्ष होते. त्यामुळे नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सरला वर्मा -विरुद्ध- दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (२००९ एसीजे १२९८)** या निर्णयानुसार मोटार वाहन नुकसान भरपाई ठरवण्यासाठीचा गुणांक १८ येतो. या सर्व बाबींचा विचार करता मृतक विक्रम यांच्या मृत्यूमुळे अर्जदारांचे उत्पन्नाचे नुकसान झाल्याची भरपाई (वार्षिक उत्पन्नाचे नुकसान रक्कम रुपये १,०९,२०० X १८) रक्कम रुपये १९,६५,६००/– येते.

**२२)** उपरोक्त नुकसान भरपाई व्यतिरिक्त मृतक विक्रम यांच्या वाहन अपघातातील मृत्यूमुळे त्यांचे अवलंबित म्हणजे अर्जदारांच्या संपत्तीचे नुकसान (Loss of Estate ) आणि अंतिम संस्काराचा खर्च सुद्धा मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात. या सदरांखाली प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– देण्यात यावे, हे स्थापित न्यायतत्त्व आहे. त्याचप्रमाणे नामदार सर्वोच्च न्यायालयाचे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड -विरुद्ध- प्रणय सेठी, [२०१७ (१६) एसएससी ६८०]** या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे सन २०१७ पासून प्रत्येक तीन वर्षासाठी १०टक्के वाढ सदर रकमेत देण्यात यावी असे नमूद केले आहे. प्रस्तुत

प्रकरणातील अपघात सन २०२४ मध्ये झालेला असल्याने सन २०१७ नंतर सहा वर्षाचा कालावधी गेलेला आहे. त्यामुळे अर्जदार सदर रकमेवर २०% वाढ मिळण्यास पात्र आहेत, म्हणजेच संपत्तीचे नुकसान आणि अंतिम संस्कार खर्च या सदराखाली प्रत्येकी रुपये १८,०००/— मिळण्यास अर्जदार पात्र ठरतात.

२३) अर्जदार क्र. १ व २ मृतक विक्रम यांचे आई–वडील आहे. त्यामुळे त्यांचा मुलगा गमावल्याच्या वियोगामुळे स्थापित न्यायतत्त्वानुसार अर्जदार प्रत्येकी रक्कम रुपये ४०,०००/— नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. त्याचप्रमाणे नामदार सर्वोच्च न्यायालयाचे **नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड –विरुद्ध– प्रणय सेठी [२०१७ (१६) एसएससी ६८०]** या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे सन २०१७ पासून प्रत्येक तीन वर्षासाठी १० टक्के वाढ सदर रकमेत देण्यात यावी, असे नमूद केले आहे. प्रस्तुत प्रकरणातील अपघात सन २०२४ मध्ये झालेला असल्याने सन २०१७ नंतर सहा वर्षाचा कालावधी गेलेला आहे. त्यामुळे अर्जदार सदर रकमेवर २०% वाढ मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे प्रत्येक अर्जदार रक्कम रुपये ४८,०००/— वियोगाची नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात.

२४) मृत विक्रम यांना अपघातानंतर दवाखान्यात दाखल केले होते व त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करण्यात आला होता असे अर्जदारांचे म्हणणे नाही. त्यामुळे वैद्यकीय उपचाराचा खर्च मिळण्यास अर्जदार पात्र नाहीत.

२५) उपरोक्त नुकसान भरपाईच्या रकमेशिवाय अन्य सदराखाली अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे अर्जदारांचे म्हणणे नाही. उपरोक्त सदराखालील पात्र ठरलेली नुकसान भरपाईची रक्कम येणेप्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | अपघातात मृत्यू झालेल्या विक्रमच्या उत्पन्नाची नुकसान भरपाई | रु. | १९,६५,६००/– |
| ब. | संपत्तीचे नुकसान (Loss of estate) | रु. | १८,०००/– |
| क. | अंतिम संस्कार खर्च | रु. | १८,०००/– |
| ड. | मुलाच्या मृत्यू वियोगामुळे नुकसान भरपाई रक्कम, अर्जदार क्र. १ व २ यांना प्रत्येकी रक्कम रुपये ४८,०००/– याप्रमाणे एकूण रक्कम | रु. | ९६,०००/– |
| | **एकूण नुकसान भरपाईची रक्कम (अ+ ब+ क+ ड)** | **रु.** | **२०,९७,६००/–** |

२६) येणेप्रमाणे अर्जदार मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरतात. सदर नुकसान भरपाईच्या रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून रक्कम वसूल होईपावेतो बँक दराने व्याज देणे क्रमप्राप्त ठरते. सध्याचा बँक व्याजदराचा विचार करता वार्षिक सात टक्के दराने व्याज देणे योग्य व वाजवी ठरेल.

२७) भविष्यातील उत्पन्न वाढीवर व्याज देता येणार नाही असे सामनेवाल्यांचे म्हणणे आहे मात्र भविष्यातील उत्पन्न वाढ ही मानिव वाढ धरून

नुकसान भरपाई ठरवण्यात येत असल्यामुळे सदरचा युक्तिवाद योग्य व संयुक्तिक नाही.

२८) अर्जदारांनी नुकसान भरपाईची रक्कम अधिक मागितली असली, तरी न्यायालयीन मुद्रांक मात्र रक्कम रुपये एक लाखावर दिलेला आहे. मात्र योग्य व वाजवी मोटर अपघात नुकसान भरपाई ठरवण्याची जबाबदारी मोटार अपघात नुकसान भरपाई न्यायाधिकरण यांच्यावर असल्याने उर्वरित न्यायालयीन मुद्रांक अर्जदारांनी सादर करण्याच्या निर्देशासह नुकसान भरपाई देण्याचा हुकूम करणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे.

२९) अर्जदारांचे मृतक विक्रम यांचेशी असलेले नाते, त्यांचे अवलंबित्व व त्यांचे वय लक्षात घेता अर्जदार क्र. १ व २ यांना नुकसान भरपाई पैकी ३० टक्के रक्कम आणि इतर अर्जदारांना प्रत्येकी १०% रक्कम देणे न्यायच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. सर्व अर्जदार हे सज्ञान आहेत. त्यामुळे नुकसान भरपाईपैकी कोणतीही रक्कम मुदत ठेवीत ठेवण्याचा आदेश करू नये, हा अर्जदारांचा युक्तिवाद योग्य व संयुक्तिक दिसून येतो, त्यामुळे नुकसान भरपाईच्या रक्कमपैकी कोणतीही रक्कम मुदत ठेवीत ठेवण्याचा आदेश करण्यात येत नाही.

३०) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची

प्रत, पॅन कार्ड बद्दल माहिती, ई-मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत देण्याचा हुकूम करणे आवश्यक ठरते.

३१) मुद्दा क्र. १ व २ यांच्यावरील निष्कर्षाच्या अनुषंगाने सदरचा अपघात ट्रक चालकाच्या भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवण्यामुळे घडला असल्याचे सिद्ध झाले आहे. सदर वाहन सामनेवाला क्र. १ च्या मालकीचे आहे, याबाबत वाद नाही.

३२) सदरचे वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे विमाकृत होते, असे अर्जदाराचे साक्षीदार क्र. १ यांनी तोंडी पुराव्यात नमूद केले आहे. सदर बाब सामनेवाला यांना सुद्धा मान्य आहे. यावरून सदर वाहन सामनेवाला क्र. २ यांच्याकडे अपघातावेळी विमाकृत होते, ही बाब सिद्ध होते.

३३) सदर विमा पॉलिसीच्या अटी शर्तींचा भंग झाला आहे, असे सामनेवाला क्र. २ यांचे म्हणणे आहे. मात्र त्या संदर्भात त्यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. अर्जदारांनी ट्रकचालकाचा वाहन चालवण्याचा परवाना निशाणी क्र.२५ वर दाखल केलेला आहे. त्यावरून तो परवाना अपघात तारखेस वैध असल्याचे दिसून येते. विमा पॉलिसीच्या कोणत्या अटी शर्तींचा भंग झाला याबाबत सामनेवाले क्र. २ यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे सदर पॉलिसीच्या अटी शर्तींचा भंग झाला आहे, ही बाब सिद्ध झालेली नाही. त्यामुळे सदर वाहनाची विमा कंपनी म्हणून सामनेवाला क्र. २ या कामी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार ठरतात.

३४) उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने प्रस्तुच्या मुद्द्यांवर निष्कर्ष नोंदवून खालील प्रमाणे आदेश करण्यात येतात -

## आदेश

१) मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज क्र. १५/२०२४ खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२) सामनेवाला क्र. २ यांनी अर्जदारांना नादोष नुकसान भरपाईच्या रकमेसह मोटार अपघात नुकसान भरपाई रक्कम रुपये २०,९७,६००/- (रक्कम रुपय वीस लाख सत्त्याण्णव हजार सहाशे मात्र) अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसूल होई पावेतो सदर रकमेवर दर साल दर शेकडा सात टक्के व्याजासह अदा करावी.

३) सामनेवाला क्र. २ यांनी नुकसान भरपाईची रक्कम या न्यायाधिकरणाच्या खालील बँक खात्यात जमा करावी व त्याबाबत खाली नमूद ई-मेलवर न्यायाधिकरणास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नाव | : | भारतीय स्टेट बँक. |
| शाखा | : | मलकापूर, जिल्हा बुलढाणा. |
| खाते क्रमांक | : | 40786745622. |
| आय.एफ.एस.सी. कोड | : | SBIN0000419. |
| ईमेल | : | mahbulmalsc@aij.gov.in |

४) नुकसान भरपाई रकमेपैकी प्रत्येकी ३० टक्के रक्कम अर्जदार क्र. १ व २ यांना आणि प्रत्येकी १०% टक्के रक्कम इतर अर्जदारांना देण्यात यावी.

**सदस्य मो.अ. दावा न्या.**

५) अर्जदारांनी नियमाप्रमाणे उर्वरित मुद्रांक शुल्क १५ दिवसाच्या आत न्यायालयात सादर करावे.

६) नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे **सुमोटो रिट पिटिशन क्र. ७/२०२५ मधील तारीख २२/०४/२०२५** च्या आदेशानुसार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अर्जदारांनी त्यांचे आधार कार्डची प्रत, पॅन कार्ड बद्दल माहिती, ई–मेल आणि बँक खात्याचा तपशील या आदेशापासून पंधरा दिवसाच्या आत न्यायाधिकरणास आत करावा.

७) अर्जदारांनी उर्वरित मुद्रांक शुल्क सादर केल्यानंतर अवार्ड करण्यात यावा.

८) येणेप्रमाणे अर्ज निकाली केला असे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PURUSHOTTAM BHAURAO JADHAV
Date: 2026.03.25 15:53:44 +0530

मलकापूर.
दिनांक – २४/०३/२०२६.

**(पुरुषोत्तम भा. जाधव)**
सदस्य,
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
मलकापूर.

– – – – –

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करते की, या न्यायनिर्णयाची अपलोड केलेली पी.डी.एफ. फाइल ही मूळ स्वाक्षरी केलेल्या न्यायनिर्णयानुसार खरी आणि बरोबर प्रत आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | मोटार अपघात दावा न्यायाधिकारण, मलकापूर. |
| लघुलेखिकेचे नांव | :- | कु. एच.डी. चौधरी, लघुलेखक श्रेणी-१ |
| न्यायनिर्णय पारीत केल्याचा दिनांक | :- | २४/०३/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | २५/०३/२०२६. |